॥ ज्योतिर्मय ॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ५३ वा ❑ शनिवार दि.२९ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# गुन्हेगारीचे वाढते प्रमाण चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये होणारी वाढ ही चिंतेची बाब आहे आणि ती समाजासाठी एक गंभीर समस्या बनत चालली आहे.ज्या पद्धतीने लोकसंख्या वाढत आहे. त्या पद्धतीने गुन्हेगारांची संख्या वाढत आहे.. गुन्ह्यांचे मुख्य कारण म्हणजे – वाढती बेरोजगारी, तरुण पिढीमध्ये सहनशीलतेचा अभाव, कमी वेळ आणि कमी प्रयत्नात श्रीमंत होण्याची इच्छा आणि क्षमतेपेक्षा जास्त इच्छा शक्ती हे देखील गुन्ह्यांना प्रोत्साहन देत असते.. गुन्ह्यांचे मूळ कारण बेरोजगारी आहे. याशिवाय उत्पन्नाचे बंधन, रुपयांचा खर्च आणि कुटुंबातील वडीलधाऱ्यांची भीती नसते. काही काळापूर्वी, कुटुंबातील सदस्यांच्या भीतीमुळे आणि त्यांच्या आदरामुळे लोक गुन्हे करण्यास घाबरत होते. आता लोकांची मानसिकता बदलली आहे.

रातोरात श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहणारे लोक आपले उदात्त छंद पूर्ण करण्यासाठी चुकीच्या मार्गाने पैसे कमविण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग निवडतात. निरक्षरता, गरिबी आणि वाढती बेरोजगारी यामुळे निर्माण होणारी निराशा आणि नैराश्य देखील वाढत्या गुन्ह्यांचे कारण बनत आहे. सहिष्णुतेचा अभाव, पोर्नोग्राफिक साहित्याची सहज उपलब्धता, गुन्हेगारांना कठोर शिक्षा नसणे किंवा शिक्षेला होणारा विलंब इत्यादी कारणांमुळे गुन्हेगारांचे धाडस वाढत आहे.

विशेष म्हणजे गुन्हेगारांना कायद्याची भीती राहिली नाही. आपल्या देशाचा कायदा कोणत्याही गुन्ह्याला शिक्षा करताना कासवाच्या मार्गाचा अवलंब करतो. शिक्षेला विलंब केल्याने गुन्हेगारांना प्रोत्साहन मिळते. मुख्य कारण म्हणजे कायद्याची कमकुवतपणा आणि त्यातील गुंतागुंत. गुन्हा केल्यानंतरही गुन्हेगार कायदेशीर मार्गांचा अवलंब करून पळून जातो. यानंतर, तो अधिक उघडपणे गुन्हे करू लागतो.

देशातील वाढत्या गुन्ह्यांना पोलिस आणि प्रशासनाचा हलगर्जीपणा जबाबदार आहे. गुन्हेगारांमध्ये पोलिस आणि कायद्याची भीती नाही. अशा अनेक घटना पाहिल्या आणि ऐकल्या जातात ज्यामध्ये गुन्हेगारांकडून पोलिसांवर हल्ला केला जातो. गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पोलिस प्रशासनाला कडक कार्यपद्धती अवलंबावी लागेल.

देशातील वाढत्या गुन्हेगारीचे मुख्य कारण म्हणजे लोक देशाची सभ्यता, संस्कृती, नैतिकता आणि व्यसनांपासून दूर जात आहेत. चांगल्या नैतिकतेचा अभाव माणसाचा मार्ग भ्रष्ट करतो. जर देशात आणि समाजात वाढत्या गुन्ह्यांना आळा घालायचा असेल तर मुलांना घरी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये नैतिकतेचे धडे द्यावे लागतील.

सध्याच्या काळात गुन्हेगारी कारवायांमध्ये वाढ होण्याचे कारण म्हणजे समाजातील सांस्कृतिक क्रियाकलाप आणि मूल्यांचा ऱ्हास. आपल्या देशाच्या संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृतीचे वर्चस्व आहे. यामुळे तरुणांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळत आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात व्यक्तीची महत्त्वाकांक्षा दिवसेंदिवस वाढत आहे. अपयशाने निराश झालेले तरुण गुन्हेगारीकडे वळतात आणि भविष्य उद्ध्वस्त करतात. पैसे कमविण्याचा लोभ त्यांना हळूहळू अशा मार्गावर घेऊन जातो जिथून त्यांना सुसंस्कृत समाजात परतणे अशक्य होते. कायदा आणि सुव्यवस्था देखील यासाठी मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे, कारण आज गुन्हेगारीला राजकारणाचे आश्रय दिले जात आहे.

गरिबी, शोषण, मत्सर, निराशा आणि दहशतीच्या भावनांमुळे गुन्हेगारी जन्माला येते. देशात वैयक्तिक गुन्हेगार आणि संघटित गुन्हेगार आहेत. एका गुन्हेगाराला वैयक्तिक प्रशिक्षणाद्वारे सुधारता येते. संघटित गुन्हेगारी राजकीय, धार्मिक आणि टोळ्यांकडून नियोजित केली जाते. सामाजिक आणि स्वच्छ राजकीय उपक्रमांद्वारे या घटकांना तोंड देता येईल.

# अमळनेरला उद्यापासून पाचवे अहिराणी साहित्य संमेलन

## खान्देशी बोलीचा जागर, परिसंवाद, कवीसंमेलनात, कथाकथन रंगणार

**ज्योतिर्मय साहित्य**

**अमळनेर –** येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात अर्थात अहिराणी सेवक माजी आमदार गुलाबराव पाटील साहित्य नगरी येथे ३० व ३१ मार्च रोजी पाचवे अहिराणी साहित्य संमेलनास प्रारंभ होत आहे. ज्येष्ठ पत्रकार व मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले उद्घाटक आहेत. या दोन दिवसात उपस्थित सर्वांनी अहिराणी भाषेतच बोलावे असा दंडक करण्यात आला आहे. संमेलनात सुप्रसिद्ध लोककवी, लेखक, विचारवंत, नाट्य कलाकार एकपात्री नाटककार, अहिराणी मिमिक्री यांच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. कार्यक्रमाची पत्रिका आयोजकांनी प्रसिद्ध केली आहे.

संमेलनात सिनेगीतकार, पार्श्वगायक प्रशांत मोरे त्यांच्या अहिराणी कविता व गाणी सादर करतील. अहिराणी शब्दकोश, ओवीकोष तसेच गीतांचे अभ्यासक डॉ. रमेश सूर्यवंशी यांचे विवेचन होईल. नाट्य अभिनेता हर्षल पाटील यांचे नाट्य अभिवाचन होईल. मिमिक्री आर्टिस्ट विलास कुमार शिरसाठ यांची अहिराणी मिमिक्री, विजय पवार तसेच एकपात्री नाटककार प्रविण माळी यांचे एकपात्री नाट्य अहिराणी प्रेमींसाठी आकर्षण ठरणार आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार अनिल पाटील, चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, धुळ्याचे आमदार अनुप अग्रवाल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटील प्रमुख अतिथी आहेत.

३० मार्च रोजी दुपारी ४ वाजता अहिराणी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक रॅली व ग्रंथदिंडी निघेल. उद्घाटन समारंभास महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव शामकांत देवरे , आयएएस अधिकारी राजेश पाटील, सहाय्यक आयुक्त अर्चना राजपूत , यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत .त्या नंतर होणाऱ्या काव्य संमेलनात कवी ज्ञानेश्वर भामरे, डॉ. वाल्मिक अहिरे, दादाभाई पिंपळे, रमेश धनगर यासह निमंत्रित कवींची काव्यमैफील रंगणार आहे.

रात्री ८ वाजेपासून जात्यावरच्या अहिराणी ओव्या, खानदेशी गाणे, अहिराणी नाटिका,कानबाई नृत्य, अहिराणी मिमिक्री, अहिराणी एकपात्री नाट्य, व अन्य कलाप्रकार यांचा समावेश असलेले खान्देशी सांस्कृतिक कार्यक्रम विविध सांस्कृतिक महिला मंडळ तसेच वैयक्तिक स्वरूपात राज्यभरातून आलेले कलाकार सादर करतील.

३१ मार्च रोजी अहिराणी माय ,आमना खानदेश आणि अभिमान अहिराणीना हे नवकवींचे सत्र होईल. यानंतर अहिराणी भाषा संस्कृती




विचार या विषयावर परिसंवाद होईल. कोल्हापूर येथील अहिराणी भाषा अभ्यासक डॉ. रविंद्र ठाकूर अध्यक्षस्थानी असतील. तर डॉ.फुला बागुल, डॉ. सदाशिव सूर्यवंशी, डॉ.सत्यजित साळवे, डॉ. जगदीश मोरे, डॉ.बाळासाहेब गुंजाळ व डॉ.कृष्णा पोतदार हे विचार मांडतील. दाभाडी येथील कथाकार एस.के .पाटील, प्राचार्य संजीव गिरासे, गोकुळ बागुल, वृषाली खैरनार यांचे अहिराणीतून कथाकथन होईल.

दुपारच्या सत्रात निवृत्त तहसीलदार सुदाम महाजन यांचा अहिराणी झटका हा विनोदी कार्यक्रम होईल. त्यानंतर निमंत्रित कवींची काव्य मैफिल रंगेल .यासाठी भाषा संचालनालयाचे अध्यक्ष सुनील शिरसाठ यांची विशेष उपस्थिती असणार आहे. त्या नंतरच्या सत्रात ‘‘आईत पोयत सख्या न‘‘ हा एकपात्री प्रयोग प्रविण माळी सादर करतील.

संमेलनाचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत व माजी आमदार कुणाल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यावेळी माजी शिक्षक आमदार डॉ.सुधीर तांबे, माजी आमदार शरद पाटील, माजी आमदार डॉ .बी.एस.पाटील प्रमुख अतिथी असतील. संमेलनास उपस्थितीचे आवाहन अहिराणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष भगवान पाटील, सचिव प्रभाकर शेळके, स्वागताध्यक्ष प्रा.डी.डी.पाटील, कार्याध्यक्ष प्रा.अशोक पवार, संयोजक प्रा. डॉ. लिलाधर पाटील, मुख्य समन्वयक रणजित शिंदे, कोषाध्यक्ष बापूराव ठाकरे, उपाध्यक्ष डी.ए. पाटील, साहित्यिक समन्वयक डॉ.कुणाल पवार, महिला समन्वयक वसुंधरा लांडगे, सचिव रामेश्वर भदाणे आदींनी केले आहे.

# मानवता आणि माणूसपण टिकण्यासाठी ग्रंथ दिशादर्शक-प्राचार्या डॉ. तिडके

**ज्योतिर्मय साहित्य**

**जालना –** माणसे घडवण्याची जवाबदारी साहित्यिकांवर असून ग्रंथ वाचनाने मानवता वाढीस लागते. सर्वसामान्यांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात साहित्यिकांनी उभे रहावे असे आवाहन प्राचार्या डॉ. सुनंदाताई तिडके यांनी केले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालय आणि जालना जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सुरू असलेल्या ग्रंथोत्सवाचा गुरूवारी ( ता. २७)प्राचार्या डॉ. सुनंदाताई तिडके यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात समारोप झाला.डॉ.संजीवनी




तडेगावकर,डॉ.रावसाहेब ढवळे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे,सतीश जाधव,शंकर पवार, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. संजीवनी तडेगांवकर यांनी सर्व ललित कला एकत्र याव्यात. दुसऱ्याचे ऐकणार नाही ही मानसिकता सोडावी लागेल. लेखक, वक्ते,श्रोत्यांनी बहुआयामी व्हावे अशा भावना डॉ. तडेगांवकर यांनी व्यक्त केल्या. डॉ. रावसाहेब ढवळे यांनी मराठी माणसाला पुस्तक विकत घेऊन वाचायची सवय नसून नव्या पिढीला शिदोरी उपलब्ध करून देण्याची जवाबदारी आपली आहे.बुध्दी आणि मनाची मशागत ग्रंथ वाचनाने होते. असे नमूद करत शाळा,महाविद्यालयाच्या प्रांगणात ग्रंथोत्सव आयोजित करावा असे डॉ. रावसाहेब ढवळे यांनी सूचवले.

राजेश राऊत यांनी यंदा तांत्रिक अडचणींमुळे ग्रंथोत्सवात राहिलेल्या उणीवा भरून काढण्याची जवाबदारी ग्रंथालय प्रतिनिधींवर असून ग्रंथालय उभे राहिले तरच दंगली थांबतील. असे राऊत यांनी सांगितले. सुत्रसंचालन प्रा. राजकुमार बुलबुले यांनी केले तर सुभाष साबळे यांनी आभार मानले. समारोपापूर्वी प्रा. बसवराज कोरे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन सत्रात शरद सदाफुले, किशोर बोर्डे यांनी सामाजिक वास्तवावर आधारित कथा सादर केल्या. सुत्रसंचालन सुरेश मेहेत्रे यांनी केले तर सुरेश खंडाळे यांनी आभार मानले. यावेळी साहित्य रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लक्षवेधी छायाचित्र....



कुठे पळून जाशील रे चोरा... अखेर सापडलाच ना

(छाया : संजय दारमवर, मुंबई)





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

# व्यावहारिक नाते ठेवत नाहीत ते खरे मित्र

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते.

आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही. काहीवेळा तर तुझं माझं जमेना पण तुझ्याविना करमेना, अशी गत ह्या मैत्रीच्या बाबतीत झाल्याचे आपण अगदी प्रत्येकजणच अनुभवत असतो.

एकही क्षण ज्या मित्र-मंडळींशिवाय जात नाही, तेच काही वेळा केवळ सगे-सोबती ठरतात. अनेकांशी दीर्घकाळ संपर्कच होत नाही. आपल्या आयुष्याची दोरी आपल्या मित्रांच्या हातात देताना अगोदर चांगले मित्र निवडणे, त्यांची चांगली पारख करण्याची जाणीव होणे जरुरीचे असते. प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली-वाईट, जवळची-लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो.

# जुने जाऊ द्या मरणालागुनी...

## (माझ्या आनंदनिधान या पुस्तकातून)




ज्योतिर्मय साहित्य

विरक्ती असलेल्या लोकांना परमारर्थात परमानंद मिळतो. ज्ञानाची आसक्ती विज्ञानाची कास हाती घेऊन परमार्थाची दिशा शोधली की ती तुम्हाला लवकर गवसेल. श्रद्धा डोळस हवी.

समर्थाचा विरक्त मोठा ज्ञानी, निष्पाप, निष्ठावंत, निरपेक्ष, विलक्षण शांत, चतुर लोकसंग्रह करणारा पुरुष आहे. मोठ्या धिराने म्हणजे कितीही अडचणी आल्यातरी तो या लक्षणाचा त्याग करत नाही. विवेक नेहमी जाग्रुत ठेवतो. साध्य,साधन, साधकता यांना सांभाळतो. जगाला भक्ती मार्गाचा रस्ता दाखवावा समाजात किंवा स्वतः च्या जीवनात शांती कशी टिकवावी शांतीचे महत्व पटवून द्यावे.



विरक्ती वेराग्याचा, अनासक्तीचा प्रसार करावा. आणि स्वतः निर्वासनता, निष्कामता आपल्या जगण्यात घट्ट धरून ठेवावी. त्याने धर्माचे महत्व पटवून द्यावे., वाढवावे आणि सतत सत्कर्म करत ते जोपासावे. त्याचे पुनरूज्जीवन करावे. नितीमान व क्षमाशील असावे. समाजामध्ये धर्माला आलेली ग्लानी दूर करावी. मंद झालेला समाज सतेज करावा. सयत चिंतनशील राहून सद्विचारांची कक्षा वाढवावी. श्रध्दावंतांना साभाळून घ्यावे. त्यांच्या भावनेचा आदर करावा टिंगल टवाळी करू नये. शरण आलेल्यांना दूर करू नये. शुध्द आत्मज्ञानाचा प्रसार करावा तो करत असताना खुप अडचणी येतील पण त्यामुळे डगमगून जाऊ नये.

भक्तीमार्गाचा प्रसार करत असताना विरक्ताने काय करावे. समुदाय जनसामान्यांना ऐकत्र करून. भजन पूजन जपजाप्य किर्तन, प्रवचने व्याख्यान माला सुरु करून समाज ऐकत्र करावा. समाज शांत, सतेज धर्माचरणात कसा राहील हे पहावे. अध्यात्मिक मार्गाने समाजमन ऐकत्र करून समाजाचे अंत:करम शुध्द कसे राहिल हे पहावे. शुद्ध अंतकरणाने समाजाची प्रगती होते . केवढा महनीय विचार आहे समर्थांचा. निर्भय, ऊदार व प्रसंगी गंभीर असावे. सतत सावध रहावे आचरण शुद्ध असावे. मरावे परी किर्ती रूपे ऊरावे असे वर्तन असावे. योगी साधू सज्जन यांना ओळखून त्यांच्याशी मैत्र ठेवावे. सतत परोपकार करावा. चित्त स्थीर ठेवावे. आसक्तीत गुतून जाऊ नये. अतंर्मुख राहून आचरण पवित्र असावे. कोणाच्या ताब्यात जाऊ नये. काळाची पावले ओळखावी .ज्ञानाच्या सर्व अंगाचा विचार करावा. विरक्त खर्या अर्थाने बहुश्रुत असावा. भगवंताच्या सगुण रूपाचे वर्णन ,वेदसिध्दांचे विवेचन ,सगुण रूपाचे भजन पूजन,परमात्म स्वरूपाचे ज्ञान,शरीररचनेचे ज्ञान, तत्वज्ञान या सर्व अध्यात्म अंगाचे ज्ञान विरक्ताने आत्मसात केलेले असावे. कर्ममार्ग,ज्ञानमार्ग, ऊपासनामार्ग कोणता सिध्दांत मार्ग कशाला म्हणतात प्रर्वुत्तीमार्ग,निर्वुत्तीमार्ग यांची लक्षणे कोणती यासर्व परमार्थ साधनेचे ज्ञान विरक्ताला असावे. **(क्रमश:)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# विरक्त लक्षण

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या मनावर बालपणापासूनचे संस्कार झालेले असतात. ज्ञानाचा भडीमार झालेला असतो. त्यात आपले स्वतःचे असे काही नसते. माणूस जन्माला आल्यापासून समाजाचा एक भाग होतो. समाज जे सांगेल, ते तो आत्मसात करत जातो. आणि समाजरूपी यंत्राचा एक भाग होतो. एखादे मोठे यंत्र आणि त्याचे छोटे छोटे भाग. ते यंत्र जसे फिरेल, तसे त्या यंत्राचे छोटे छोटे भाग फिरत असतात. त्यांना फिरावेच लागते. चॉईस नसतो. तसेच आपणही या समाजरूपी यंत्राचा एक भाग होऊन गेलेलो असतो. त्याच्या बरोबरच फिरत असतो. आणि त्यात धन्यताही मानत असतो. पण स्व ला विसरलेलो असतो. सगळी गडबड होते ती इथे.

आतापर्यंत आपण जे काही ज्ञान आत्मसात केलेले असते ते असते बाहेरून आलेले. ते असते रेडिमेड. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर सेकंड हॅन्ड. आता मी या ठिकाणी जे बोलतो आहे, ते आपण शिकतो त्या पुस्तकी ज्ञानाबद्दल नव्हे. तर एक मनुष्य म्हणून स्वतःची जी उन्नती करून घ्यायची आहे, त्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान. हे ज्ञान बाहेरून मिळवता येत नाही. ते स्वतःच मिळवावे लागते. त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी असावी लागते. एखाद्या गोष्टीची तुम्ही स्वतः जोपर्यंत अनुभूती घेत नाही, तोपर्यंत तुम्हाला नवीन ज्ञान मिळणार नाही. संतांच्या उपदेशातील एक तरी ओवी अनुभवावी असे जे म्हटले जाते, त्याचा मतितार्थ हाच आहे. **(क्रमश:)**

# निर्हेतुक कर्मात भगवंत



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

खरोखर, आज आपल्याला आपले अंतरंग ओळखण्याची खरी गरज आहे. सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, हेतूवर सर्व काही अवलंबून असते. पुष्कळ पुण्यकर्मे केली, आणि काही तरी विषयाचा हेतू मनात धरला, तर काय उपयोग ! काबाडकष्ट खूप केले, बायकोपोरे टाकून बाह्यांगाने कितीही केले, तरी मन जोपर्यंत तिथे नाही तोपर्यंत राम नाही भेटणार. मनाला भगवंताची तळमळ लागली तरच त्याचा उपयोग. निर्हेतुक कर्मात भगवंत असतो, म्हणून आपली कर्मे तशी करावीत. खरे पाहता प्रापंचिकाएवढे काबाडकष्ट साधकाला, पारमार्थिकाला नसतात. प्रपंचाच्या काबाडकष्टांपेक्षा निम्म्याने जरी भगवंताकरिता केले तरी खूप फायदा पदरात पडेल. ज्या स्थितीत भगवंताने आपल्याला ठेवले त्या परिस्थितीतून त्याला ओळखणे सहज शक्य आहे. पण आपण विषयाकडे दृष्टी ठेवून कर्मे करतो, आणि भगवंत भेटत नाही म्हणून दु:खी होतो, याला काय करावे ? दैत्यदानवांनी भगवंताची तपश्चर्या केली, आणि समर्थांनीही केली; दानवांनी हेतू धरून केली त्यामुळे त्यांना हेतूचा, विषयाचा लाभ झाला, परंतु भगवंत अंतरला; याउलट, समर्थांना भगवंताशिवाय दुसरा कशाचाही लाभ नको होता. त्या लाभातच त्यांनी सर्वस्व मानले. उत्कट प्रेमामुळे भगवंताचा ध्यास लागतो. भगवंताला पाहून 'तू भेटलास, आता मला काही नको', अशी वृत्ती झाली पाहिजे, तरच मीपणा मरेल. भगवंताचा हात तर पुढे आहेच; आपलाच हात त्याच्यापर्यंत पोहोचत नाही.

बुद्धीपेक्षा आणि पैशापेक्षा सदाचरणाचे वजन जास्त असते. सदाचरण असून भगवंताची निष्ठा असेल, आणि आहे त्या परिस्थितीत समाधान ठेवण्याची सवय असेल, तर प्रापंचिक सुख लाभते. सुख हे कुठून उत्पन्न करायचे नसून ते आपल्या वृत्तीमध्येच असते. 'मी' भगवंताचा आहे, तसेच 'सर्वजण' भगवंताचे आहेत. म्हणून भगवंतावर प्रेम केले की सर्व जगावर प्रेम बसेल. ज्याप्रमाणे भगवंताच्या प्रसादामध्ये एखादा कडू बदाम आला तरी तो आपण खातो, त्याप्रमाणे भगवंताने एखादे वेळी दु:ख दिले तर ते आनंदाने सोसायला पाहिजे. चिकित्सा थोडी बाजूला ठेवून भगवंताचे आपण स्मरण करावे. अंत:करणाची शुद्धी नामाशिवाय नाही होणार. नामापरते काही नाही हे एकदाच ज्याच्या मनाने घेतले त्याला दुसरे काही सांगावे नाही लागत. मीठ म्हणून जरी साखर खाल्ली तरी साखरेची गोडी आल्याशिवाय राहात नाही; त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जरी नाम घेतले तरी ते आपल्याला तारकच ठरेल यात शंका नाही.

ज्याच्यामागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो.

## संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

# मेडिटेशन



ज्योतिर्मय साहित्य

थीटा अवस्था आपली झोपेची स्थिती, चेतन मन झोपलेले, अवचेतन मनाचे खेळ सुरुच.. फ्रिक्वेन्सी ३.५ ते ७ हर्ट्झ

डेल्टा अवस्था गाढ निद्रेची स्थिती. फ्रिक्वेन्सी ०.५ ते ३.५ हर्ट्झ फक्त माणुसच नाही तर ह्या ब्रम्हांडातील प्रत्येक गोष्ट एक फ्रिक्वेन्सी सोडत्येत. आपल्या आजुबाजुला वातावरणाचा एक थर आहे, त्याला म्हणतात आयनमंडल. विचारांचे आदानप्रदान करणारं हे माध्यम आहे. याची फ्रिक्वेन्सी आहे ६.८ हर्ट्झ.

आता वरच्या सर्व फ्रिक्वेन्सीचे आकडे पडताळुन पहा. वातावरणाची आणि मनाच्या अल्फा स्टेटची फ्रिक्वेन्सी एकच आहे.

म्हणजे जर आपण आपल्या मनाला अल्फा स्टेटला नेलं, तर वातावरणच्या माध्यमाचा वापर करुन आपण आपल्याला हवं ते घडवु शकतोअल्फा स्टेट म्हणजेच ध्यानाची अवस्था

प्रत्येकानं जितकं आपलं वय आहे तितकी मिनीटे रोज ध्यान करायलाचं हवं, काही क्षणासाठी तरी सर्व विचार दुर सारुन स्वतः मध्ये डुंबुन जायला हवं. मन चंचल आहे, पण रोजच्या सरावाने ते हळुहळु शांत-शांत व्हायला लागतं. मग एका वेगळ्याच आनंदाची अनुभुती यायला लागते. ध्यान संपवताना ज्या गोष्टी आपल्याला हव्या आहेत त्यावर लक्ष्य केंद्रित करायचं, म्हणजे त्या आपल्याला ऑलरेडी मिळालेल्या आहेत असं फिल करायचं.

आयुष्यात घडणाऱ्या चांगल्या गोष्टींबद्दल देवाला मनापासुन 'थँक यु' म्हणायचं.. आणि जोमाने रोजच्या कामाला लागायचं. बस!निर्धास्त रहा, विश्वास ठेवा!

आता ब्रह्मांड तुमच्या स्वप्नातल्या साऱ्या गोष्टी तुम्हाला मिळवुन देण्यासाठी आकाशपाताळ एक करेल

अशा ध्यानाचा इफेक्ट म्हणजे याने स्मरणशक्ती प्रचंड वाढते. मन चिंतामुक्त होतं. मनात साचलेली जळमटं आणि कचरा स्वच्छ होतो, ताजतवानं वाटतं, नवनव्या कल्पनांची कारंजी मनात उसळी मारायला लागतात.

कामाचा आवाका वाढतो, आत्मविश्वास वाढतो. काम करण्यात आनंद मिळतो, मोठीमोठी इतरांना अवघड वाटणारी कामं आपल्याकडुन चुटकीसरशी होतात.

आणि

आपलं मन आनंदाने नाचत बागडत गाणं गायला लागतं.



# नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**रे रे चातक सावधानमनसा मित्र क्षणं श्रूयता**
**मम्भोदा बहवो वसन्ति गगने सर्वेऽपि नैतादृशा:।**
**केचिद् वृष्टिभिरार्द्रयन्ति वसुधां गर्जन्ति केचिद् वृथा**
**यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि दीनं वचः ।।**

अर्थ – अरे मित्र चातका, क्षणभर सावधान चित्त करून ऐक. आकाशात अनेक प्रकारचे मेघ असतात. परन्तु ते सर्व एकसारखे नसतात. काही मेघ आपल्या वृष्टी ने जमीनीचे सिंचन करतात. काही व्यर्थ गर्जना करतात. म्हणून दिसेल, त्या मेघाला तू याचना करू नकोस.

या श्लोकात अन्योक्ती आहे. चातक म्हणजे याचक होय. मेघ म्हणजे श्रीमंत माणसं. काही लोक मदतीच्या वल्गना करतात; तर काही लोक न बोलता प्रत्यक्ष मदत करीत असतात. व्यक्तीने मदतीची याचना करताना लोकांची पारख प्रथम केली पाहिजे. जे लोक केवळ वल्गना करतात, त्यांना नव्हे; तर जे लोक प्रत्यक्ष मदत करतात; त्यांच्याकडे याचना केली पाहिजे, असे या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी सुचविले आहे.



## आरोग्य संजीवनी

# सोरायसिस लक्षणे आणि कारणे

ज्योतिर्मय साहित्य

सांधे दुखी

सोरायसिस तीव्र झाल्यास त्यामुळे तुम्हाला सोरायटिक आर्थ्राटीसचा त्रास जाणवू शकतो. सोरायटिक आर्थ्राटीसमुळे तुमच्या सांध्यावर वाईट परिणाम होतो. तुमच्या एक अथवा दोन्ही बाजूचे सांधे यामुळे दुखावले जाऊ शकतात. यामुळे हाता-पायाच्या सांध्यामध्ये सूज आणि वेदना होतात. वेदनेची तीव्रता इतकी वाढत जाते की यामुळे तुम्हाला दैनंदिन कामे करणेही कठीण होते.

सोरायसिसची कारणे

सोरायसिस होण्यामागची कारणे प्रत्येक व्यक्तामागे वेगवेगळी असतात. त्यामुळे सोरायसिस होण्यामागचं नेमकं कारण कुणीच सांगू शकत नाही. मात्र ही काही कारणं आहेत ज्यामुळे सोरायसिस होऊ शकतो.

अनुवंशिकता

काही संशोधनात असं आढळलं आहे की जर एखाद्याच्या आई-वडीलांना, आजी-आजोबांना अथवा भावंडांना सोरायसिस झाला असेल तर त्या व्यक्तीला सोरायसिस होण्याचा धोका इतरांच्या तुलनेत जास्त असतो. यामागे त्यांच्यातील अनुवंशिकता कारणीभूत असू शकते. जरी तुमच्यामध्ये अनुवंशिक गुण असले तरी वातावरणातील बदलामुळेच हे गुणधर्म कार्यान्वित होतात. त्यामुळे जोपर्यंत वातावरणात असे बदल होत नाहीत तो पर्यंत सोरायसिस त्या व्यक्तीमध्ये सहज विकसित होत नाही.

त्वचेवरील जखमा

जर तुमच्या त्वचेवर कापल्याच्या, ओरखडे उठल्याच्या, कीटकदंशाच्या, एखाद्या इनफेक्शनच्या जखमा असलीत तर अशा स्थितीत सोरायसिस बळावण्याची शक्यता दाट असते. त्यामुळे त्वचेवरील अशा गंभीर जखमा हे देखील सोरायसिस होण्यामागचं एक कारण असू शकतं. बऱ्याचदा गंभीर प्रमाणात झालेलं सनबर्नही सोरायसिस होण्यामागचं एक कारण असू शकतं. त्यामुळे जर तुमच्या त्वचेवर अशा जखमा असतील तर त्यावर त्वरीत योग्य ते उपचार करा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

सुर्यप्रकाश

मानवी शरीराच्या वाढ आणि विकासासाठी योग्य प्रमाणात सुर्यप्रकाश मिळण्याची आवश्यकता असते. कारण सुर्यप्रकाशातून शरीराला व्हिटॅमिन डी चा पूरवठा होत असतो. मात्र नैसर्गिक सुर्यप्रकाश हा प्रमाणातच मिळणं गरजेचं आहे. शिवाय सकाळचे कोवळे ऊनच त्वचेसाठी उपयुक्त असते. त्यानंतरचे प्रखर ऊन त्वचेसाठी उपयुक्त तर ठरत नाही उलट अपायकारक ठरू शकते. अशा प्रखर सुर्यप्रकाशामुळेही सोरायसिस होऊ शकतो, शिवाय ज्यांना आधीच सोरायसिस आहे त्यांच्यासाठी सुर्यप्रकाश हानिकारक ठरू शकतो.

औषधे

काही औषधे आणि स्टिरॉईडच्या वापरामुळेही शरीरात दाह आणि जळजळ निर्माण होते. ज्याचा परिणाम त्वचेवर सोरायसिस होण्यावर होऊ शकतो. त्यामुळे जर तुम्ही घेत असलेल्या औषधांमुळे अथवा स्टिरॉईडमुळे तुम्हाला त्वचेवर गंभीर लक्षणे जाणवू लागली तर अशी औषधे घेणे त्वरीत थांबवा. शिवाय याबाबत डॉक्टरांचा योग्य तो सल्ला घ्या.

***



# जात्यावरच्या ओव्या......

---

## नातेसंबंध - आई-वडील

माय माय करू
माय मोहोळाचं मध,
अंतरी घे ना शोध
ताकाचं व्हयना दूध ||३||
माय माय करू
माय साखरच पोतं,
खूपसले दोन्ही हात
काही केल्या व्हयना रित ||४||

---

संदर्भ: कै. गवणाबाई बोराडे
संकलन: सौ मनोरमा बोराडे

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

मागील भागापासून रवींद्रनाथांच्या कथाविश्वाचा आढावा घ्यायला आपण सुरुवात केली आहे. रवींद्रनाथांच्या कथांना निसर्गाची नुसतीच पार्श्वभूमी लाभली आहे असे नाही. त्यांच्या कथांमध्ये निसर्ग आणि माणूस हातात हात घालून चालतात. किंबहुना माणूस हा निसर्गाचा एक भाग झालेला दिसतो. निसर्गात होणाऱ्या फेरबदलांची पार्श्वभूमी मानवी भावभावनांना लाभलेली दिसते. परंतु शेवटी त्यांच्या कथेत महत्वाचा आहे तो माणूस. माणसाच्या स्वभावाचे, वागण्याबोलण्याचे एवढे जिवंत वर्णन त्यांच्या कथेत आलेले असते की त्यांची पात्रे दीर्घकाळ आपल्या मनात घर करून राहतात. या भागात आपण त्यांच्या तीन कथा थोडक्यात पाहू. काबुलीवाला, अंध भिकारीण आणि अतिथी.

काबुलीवाला ही रवींद्रनाथांची अतिशय लोकप्रिय कथा आहे. या कथेवर पूर्वी चित्रपटही निघाला होता. या चित्रपटात अभिनेते बलराज साहनी यांची प्रमुख भूमिका होती. आपल्यापैकी अनेकांनी तो पाहिलाही असेल. शालेय पाठ्यपुस्तकातही या कथेचा समावेश होता. ही कथा थोडक्यात अशी आहे. मिनी नावाची एक छोटी पाच सहा वर्षांची गोड पोरगी आपल्या आईवडिलांसह राहत असते. मिनीचा स्वभाव चौकस आहे. ती सतत निरनिराळे प्रश्न विचारून आपल्या आईवडिलांना भंडावून सोडत असे. एक दिवस सुका मेवा विकणारा काबुलीवाला तिच्या दारावरून जात असतो. त्याला ती हाक मारते. हा काबुलीवाला उंचपुरा, धिप्पाड आहे. त्याच्या खांद्यावर एक मोठी झोळी असते. मिनी त्या काबुलीवाल्याला पाहून सुरुवातीला घाबरते. पण नंतर त्यांच्यात चांगली मैत्री होते. काबुल प्रांतातून बदाम, किसमिस आदी सुकामेवा घेऊन हा रहमत पठाण विक्रीसाठी भारतात येत असतो. वर्षातून एकदा ठराविक वेळी तो आपल्या घरी जातो. या काबुलीवाल्याला मिनीच्या वयाचीच एक मुलगी असते. मिनीला पाहून त्याला आपल्या मुलीची आठवण येते. तिच्यातच तो आपल्या मुलीला पाहतो. खरेतर मिनीच्या आईला काबुलीवाला आणि मिनी यांच्यातील मैत्रीचे संबंध आवडत नाहीत. काबुलीवाला तिला पळवून नेईल असाही संशय तिच्या मनात असतो. पण तरीही त्यांची ही मैत्री सुरु असते. एक दिवस काबुलीवाला मिनीला म्हणतो, तू सासुरवाडीला जाऊ नकोस. सासुरवाडी म्हणजे काय ते कळण्याचे मिनीचे वयही नसते. ती उलट त्यालाच विचारते, तू जाणार का सासुरवाडीला ? तेव्हा काबुलीवाला म्हणतो, मी सासऱ्याच्या नाकावर एक ठोसा ठेवून देईन. दोघेही हसतात. असे त्यांचे हास्यविनोद सुरु राहतात. एक दिवस रस्त्यावर गलका ऐकू येतो. काबुलीवाल्याला पोलीस पकडून नेत असतात. मिनी त्याला पाहते. त्याने कोणावर तरी सुरीने हल्ला केलेला असतो. त्याच्यावर हल्ल्याचा आणि चोरीचा आळ येऊन त्याला जवळपास पंधरा वर्षे तुरुंगात काढावी लागतात. या मधल्या काळात मिनीला नवीन मैत्रीणी मिळतात. आणि ती काबुलीवाल्याला विसरूनही जाते. पण नंतर खऱ्या चोराचा शोध लागतो आणि काबुलीवाल्याची सुटका होते. तो मिनीच्या घरी तिला भेटायला येतो. आता काबुलीवाला जरा थकला आहे. त्याचे कपडे खराब झाले आहेत आणि अवतार न ओळखता येण्यासारखा झाला आहे.

# सामाजिक कामासाठी यावर्षी ७९ सामाजिक संस्थांना एकतीस लाख रकमेची मदत

**ज्योतिर्मय साहित्य**

**गडचिरोली–** ''समाजकार्यात सेवानिवृत्त बँक कर्मचारी,अधिकारी किती सक्षम असू शकतात ज्यांच्या आर्थिक मदतीमुळे व सामाजिक कार्यातून समाजाला दिशा व प्रेरणा मिळते हे बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेने गेल्या पंचवीस वर्षात भरीव कामगिरी करून दाखविले आहे'' असे प्रतिपादन गडचिरोली येथील सामाजिक कार्यकर्ते व ''आम्ही आमच्या आरोग्यासाठी'' संस्थेचे संस्थापक डॉ सतीश गोगुलवार यांनी केले. भारतीय मजदुर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज वेलफेअर ऑर्गनायझेशनद्वारा आयोजित नवी पेठ येथील निवारा सभागृहात ''सामाजिक कृतज्ञता निधी समर्पण'' समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ गोगुलवार बोलत होते.डॉ गोगुलवार यांनी पुढे सांगितले ''आदिवासी बांधवांशी संवाद सुरू केल्यानंतर तेथील लोकांच्या प्रश्नाचा अभ्यास केला.आरोग्य,रोजगार याचबरोबर सेंद्रिय शेती कडे देखील लक्ष देण्याची गरज आहे तेथील हवामानातील बदल ही लक्षात घेतला पाहिजे. त्याप्रमाणे तेथे कार्य केले पाहिजे''.

या वेळी शुभदा देशमुख यांनी गडचिरोली येथील महिलांसाठी बचतगट द्वारे चालणाऱ्या विविध उपक्रमाची तसेच महिला सक्षमीकरणासाठी करत असलेल्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस होते.नारायण अचलेर कर, मोहन घोळवे, भास्कर माणकेश्वर, संतोष गदादे, डॉ सुनील देशपांडे, शुभदा देशमुख, अर्चना सोहनी, डॉ संजय बारगजे यांची यावेळी मुख्य उपस्थिती होती.

''दरवर्षी समाजात काम करणाऱ्या विविध संस्थांच्या प्रकल्पाची व कार्याची पाहणी केली जाते. समाजातील उपेक्षित, दिव्यांग, गतिमंद, एड्सग्रस्त,तसेच अनेक वैद्यकीय सेवा, पर्यावरण, कृषी, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांना संघटनेच्या सदस्यांनी स्वतःचे पैसे टाकून आत्तापर्यंत तीन कोटी रुपयांपर्यंत मदत केली असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेचे महासचिव नारायण अचलेरकर यांनी यावेळी सांगितले.भविष्यातहीअसे समाजकार्य चालूच राहील अशी ग्वाही या वेळी दिली.यावेळी स्मरणिकेचे प्रकाशनही पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

आदर्श गो सेवा, महामानव बाबा आमटे बहुउद्देशीय संस्था,स्वामी विवेकानंद जीवनज्योत संस्था,नर्मदालय, अल्पपरिवार, आरोग्य भारती, भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, चैतन्य ज्ञानपीठ, आस्था फाउंडेशन,प्रीतम फाऊंडेशन, शिवसमर्थ




संस्था, सिद्धार्थ सामाजिक विकास संस्था यासह एकूण ७९ संस्थांना यावर्षी निधी वितरित करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक नारायण अचलेरकर यांनी केले.बाळासाहेब फडणवीस यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.मोहन घोळवे यांनी कार्यक्रमाची माहिती दिली.पाहुण्याचा परिचय मनीषा साने ह्यांनी करून दिला. मुकुंद भस्मे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास सेवा संस्थांचे प्रमुख,सामाजिक कार्यकर्ते,महाराष्ट्र बँकेतील देशभरातून आलेले प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कीर्तनाची परंपरा हा अमूल्य ठेवा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सोनी मराठी वरील कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार कार्यक्रमाला शुभेच्छा

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई –** कीर्तनाची परंपरा फार जुनी आहे. या परंपरेशी सर्व प्रकारचे लोक जोडले गेले. ही परंपरा छत्रपती शिवाजी महाराज यांनी जपली. स्वराज्याच्या स्थापनेमध्ये या संत शक्तीचा, कीर्तन शक्तीचा, प्रबोधनाचा प्रचंड मोठा वाटा आहे. म्हणूनच ही परंपरा अमूल्य ठेवा आहे, की जो पुढच्या पिढ्यांपर्यंत नेण्याचे काम करणे गरजेच आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

रवींद्र नाट्यमंदिर येथे सोनी मराठी आणि पु. ना.गाडगीळ ॲन्ड सन्स, चितळे बंधू यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी प्रा. सदानंद मोरे, 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार या कार्यक्रमाचे परीक्षक ह.भ.प. राधाताई सानप, ह.भ.प. जगन्नाथ पाटील महाराज, सोनी एंटरटेनमेंटचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव बॅनर्जी पु.ना. गाडगीळ ॲन्ड सन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित मोडक आदी



मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार या संकल्पनेवर कार्यक्रम तयार केला याबद्दल सोनी मराठीचं मनापासून अभिनंदन. माध्यमं बदलत आहेत. आणि ज्याला आपण कम्युनिकेशन म्हणतो, त्याच्यामध्ये सोनीसारखे प्लॅटफॉर्मची खूप महत्त्वाची भूमिका आहे. कीर्तन ही अतिशय जुनी परंपरा आहे आणि कीर्तनकारांनी कीर्तनातून, निरूपणातून, अभंगातून, गायनातून, जे विचार समाजामध्ये पोहोचवले, जे समाज प्रबोधन केलं, ते खऱ्या अर्थानं अतिशय अवर्णनीय अशा प्रकारचं आहे. कीर्तनातून लोकप्रबोधन केलं जाते. सामान्य माणसाला भक्ती परंपरेशी जोडून, कोणत्याही परिस्थितीमध्ये तो निराश होणार नाही, त्याच्यामध्ये जगण्याची आणि लढण्याची वृत्ती राहील अशा प्रकारचा प्रयत्न कीर्तनामधून केला जातो. या परंपरेचं सगळ्यात मोठं महात्म्य म्हणजे कीर्तनकारांकडे जगाचं ज्ञान आहे, वैश्विक विचार आहे, पण तो वैश्विक विचार सांगत असताना तो साध्या भाषेमध्ये सांगितला जातो की सामान्यातल्या सामान्य माणसाला तो वैश्विक विचार समजतो, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी संत नामदेव महाराजांचे १६वे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास, सावता महाराजांचे १७वे वंशज ह.भ.प. रवीकांत महाराज वसईकर, शेख महंमद महाराजांचे दहावे वंशज ह.भ.प. जब्बार महाराज शेख, संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. बापूसाहेब महाराज देहूकर, संताजी महाराज जगनाडे यांचे १४वे वंशज ह.भ.प. जनार्दन महाराज जगनाडे, संत बहिणाबाईचे १३वे वंशज ह.भ.प. प्रमोद पाठक, संत नरहरी महाराज यांचे २१वे वंशज शंकर महामुनी, संत एकनाथ महाराजांचे १४वे वंशज ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' या कार्यक्रमात विजयी ठरणाऱ्या कीर्तनकारास देण्यात येणाऱ्या चांदीची सुंदर, सुबक वीणाचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. सदानंद मोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

# जिव्हाळ्याच्या सर्व ठिकाणांचा दिलखुलास परिचय देणारा काव्यसंग्रह, '' गावाकड चल माझ्या दोस्ता.''

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या गावातील सातवीपर्यंतची शाळा पूर्ण करून खेड्यातला एक विद्यार्थी शहरातल्या शाळेत येतो. सुरुवातीला तो भांबावून जातो. त्याला शहरात मुळीच करमत नाही. हळूहळू दोन चार जिवाभावाचे मित्र त्याला शहरात ही मिळतात. आणि एक दिवस तो आपल्या मायेच्या सगळ्या ठिकाणांचा परिचय आपल्या शहरातल्या दोस्तांना देतो. त्याच ह्या कविता आहेत. चंद्रगुप्त, विजय, अजय आणि हर्षवर्धन या दोस्तांना समर्पित असणारा काव्यसंग्रह.

कवितेचा संवेदनशील मार्मिक सार मलपृष्ठावर व्यक्त होतो.

या काव्यसंग्रहात एकूण सव्वीस कविता आहेत. पहिली कविता गावाकड ही कविता खेड्यातील लोकांच्या दिनचर्येची, कष्टांची उन्हातान्हात केलेल्या काबाड कष्ट मेहनत आणि आलेल्या नैसर्गिक आपत्तीचे वर्णन काळजाचा ठाव घेतात.

आजीचा मळा या कवितेत कवीं ने विहिरीचे वर्णन, झाडाचे, ताक डेरा, पाक पिपा, या बाबींचे वर्णन आहे.गुराखी मेळा, शेतकरी, औटकरी विसावा घ्यायचे, आजी सर्वांना ताक पाक द्यायची आणि नंतर आघळ पाघळ गोष्टी नेमाने व्हायच्या. डोळ्यासमोर देखावा ज्वलंत उभा राहतो.

आजी या कवितेत आजीचे हात जरी कष्ट करून करून वयस्क झाले असले तरी तिचा हात तोंडावरून फिरल्यास जो आपलेपणा, लळा, जिव्हाळा, प्रेमाची ऊब मिळते ती अतुलनीय आहे.आजीला कसलेच व्यसन नाही ही कौतुकास्पद बाब आहे. आयुष्याला आजीने कसलाच बट्टा लागू दिलेला नाही.आजीला पशु पक्ष्यांची बोली पण कळत होती.

आजोबा ही कविता आजोबा यांच्यातील गुणवैशिष्ट्यावर आधारित आहे. आजोबा गोष्टी सांगतात आणि खोटं बोलल की झाडाला टांगतात हा नेहमी खरे बोलण्याचा संस्कार आजोबांकडून झाला. आजोबा भजनात मृदंग वाजवतात. त्यांच्या मांडीवर डोकं ठेवून मी झोपतो.

आई घरादाराची शान शोभा अभिमान आहे.ती स्वतः शीळ पाक खाते आणि इतरांना ताजे खाऊ घालते अशी आई दूध, तूप सर्वांना देते स्वतः मात्र फक्त ताक घेते. लेकरांच्या तृप्ती युक्त ढेकरने आईचे पोट भरते. दिवाळीला देखील ती इतराना कपडे घेते पण स्वतः लाच घेत नाही. आईच्या काळजीचे वर्णन केले ले आहे.

वडील. शेतकरी वडील रात्रंदिवस शेतात राबतात. अंगावर चिंध्या लेऊन, चटणी भाकर खाऊन, ऊस तोडीला जातो कारण जगाला साखर खायला मिळण्यासाठी तो काबाडकष्ट करतो. त्या कष्टाळू व्यक्तीच्याच पायात का काटा मोडतो ?

शेतकरी हा पूर्ण जगाचा पोशिंदा असतो. तो कष्ट करतो आणि माप मात्र दुसऱ्याला देतो. वडील लाकड फोडतात आई चूल पेटविते, पीठ तयार होण्यासाठी जो घाम गाळावा लागतो तो त्याची चव काय सांगावी. आम्ही कष्ट करून खातो आणि जग मात्र हपापलेले आहे. डोळ्यात अश्रू आले किती भावपूर्ण मार्मिक आशयघन शब्दरचना आहे. ही रचना या काव्य संग्रहाचा मुकूटमणी आहे.

बहीण यात बहिणीच्या कामसू वृत्तीचे वर्णन आहे . आणि बहिणीचे लग्न होणार म्हणाल्यावर जी काही हृदयात विरह वेदना होते तशीच विरह वेदना तिचा हात लागलेल्या रांजणला, जात्याल आणि तिच्या मैत्रिणी देखील त्या कल्पनेने वेड्यापिष्या झाल्या आहेत. हो ती आता सासुरवाशीण होणार आपल्याला सोडून जाणार ही भावना मनाला खिन्नता देते आणि अश्रू ही प्रदान करते. माहेरच्या साडी मधील बहीण भाऊ प्रेम भाव याची अनुभूती आली.

भाऊ. कवी मित्रांना म्हणतो की आपण थोरला भाऊ जो शेतात राबायला जातो त्यास भेटाया जावू. रान मेवा खाऊ.रात्री शेतात राखण करायला गेल्यास माझ्या भावाच्या आवाजाने वाघाला देखील डरकाळी देण्याचा विसर पडतो. दादा कुस्ती खेळतो. त्याची वासरशी असणारी दोस्ती पण कवी मित्रांना सांगतो. काळी जमीन त्याचा फळा आहे. झाडाझुडुपाच्या संगतीत राहिल्यामुळे त्याचा त्यांना लळा लागला आहे. मोकळ्या गळ्याने गाणे गातो. भावाचे बोलणे रोख ठोक आहे त्यामुळे त्याला बोलायला देखील लोक घाबरतात.वहिनी आल्यावर देखील दादा माया करील का ? की मला वस वस करील?

वहिनी आली तेव्हा कवी सर्वांना नको नको




वाटायचा पण नेमका वहिनीला तो हवा हवा वाटायचा. वहिनीच्या हाताची अंघोळ आणि तिच्या हाताने केलेला मेक अप आणि वाहिनी कवीला राव साब म्हणून हाक मारायची आदर द्यायची. वहिनीला कवीला पाहून लहान भावाची आठवण येई.

वासरू आणि लेकरू या कवितेत नाकात आणि कानात वार भरलेल्या वासराला हुंदडायला किती किती मजा येते याचे सुरेख शब्दांकन केलेलं आहे. त्या वासराला पकडण्यासाठी जेव्हा लेकरू येते तेव्हा दोघांनी केलेल्या खोड्यांचे यात वर्णन आहे.

दोघांनाही जणू आले पंख
कानात वाजवी रानवारा शंख
मला नको शाळा तुला नको गोठा
तुझा माझा पाहा दोस्ताना मोठा
या नंतर वासरू लेकराचे प्रबोधन करते.

शाळा कशी नको शिक शिक बाळा
उन्हातान्हा मधी होशील तू काळा
सकाळी आणि संध्याकाळी आपण खूप मजा करू तू खूप मोठा झालास साहेब झालास तरी माझा गोठा मात्र कधी विसरू नको.

कोड या काव्यात मामाच्या वाड्याचे, तेथील गाईचे वर्णन आहे. कवी झोपेतून उठण्या अगोदरच त्या गायब व्हायच्या. रातीचा चांदवा
गेला उडून
सकाळी भाचा
सांगतो रडून
चांदण्या गायब,
खाटेवर झोपलेली म्हातारी
गायब, गायी गायब मामा
देखील लुप्त अशा वेळी
भाचा रडतो रडून रडून
साऱ्या गोष्टी सांगतो.



**पुस्तक परीक्षण**

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

गाय गुणी आहे. गाईला शिस्तीत उभे राहायला कोणी शिकविले हा प्रश्न कवीला पडला आहे.गाईला आंजरल गोंजारल कोणीही तरी गाय मारत नाही. गाय गरीब आणि मायाळू होतीच. शिंग मारत नव्हती आणि लाथ पण मारत नव्हती. नीरस दूध पिण्याची आणि त्या दुधाची फेस युक्त मिशी खालच्या आणि वरच्या ओठावर यावी. गाईच्या वर्णनात्मक उपमा अतिशय हृदयस्पर्शी आणि चपखल आहेत.

वासरू वारा सुटल्यावर असे सुसाट पळते जसा चपळ पारा होय. गाईचे कधीच न ऐकणारा डरकाळी ऐकून मात्र पळतच जवळ येते.

बोरीच झाडं गोड बोर असणार आहे. बोरीच्या काट्याची काढतील तसा खोल खोल रुतत जातो. बारीक बोराची मधाळ चव. ही बोर खाण्यासाठी पोर रानात येतात आणि सारं धान तुडवतात. त्यांची खोड वाकड्या काठीने मोडतो.

पाखर रानात येणाऱ्या पाखरांचा थवा देतात दुवा. त्यात चिमण्या. पोपट, मैना, कोकिळा, मोर. होल्याची जोडी, पारवा, चित्तूर अशा सर्व पक्ष्यांच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी वर्णन या काव्यात केलेली आहे.

साळुंकी आणि मोर साळुंकीने लग्नासाठी सोनेरी पाय मोराकडून घेतले ते कधी परत केलेच नाहीत. बेईमान साळुंकीचा कुठेच पत्ता नाही. काळे पाय पाहून अजूनही रडतो मोर आभाळात काळे ढग आले की मोराचा देखील गळा दाटून येतो.

बहीण भाऊ या कवितेत भाऊ बहिणीला भेटायला जातो आणि तिकडे ती स्वयंपाक करण्यात मग्न होते. इकडे भावाला वाटते ती रुसली आणि तो तसाच परत जातो. बहीण खूप रडली. असे बहीण भावाचे प्रेम शुल्लक गैरसमजामुळे दुरावले याचे पडसाद या कवितेत आहेत.

शाळा ,रविवारची कामे, दादा दूर गेला, या कविता देखील चांगल्या आहेत.

दिवाळी ,ग्रंथगीता हे अभंग स्वरूपातील सुंदर रचना आहेत. ग्रंथगीता यात ग्रंथ महत्व, ग्रंथ महात्म्य वर्णन केले आहे.

निश्चय, आम्ही, जिजाऊच बालपण, शिवाजीचे बालपण या कविता देखील मुलांच्या मनावर सु संस्कार घडवितात. मनाला वळण लावणारा आणि देणारा ,अनेक मूल्यांची रुजवणूक करणारा सुरेख काव्यसंग्रह, बालमनात सुरेख घर करणारा काव्यसंग्रह.पहिलीच्या विद्यार्थ्यांना हा काव्यसंग्रह फारच आवडला. आज आमच्या वर्गातील प्रीतम काव्य संग्रह वाचण्यासाठी हाती मिळाला नाही म्हणून रुसून घरी गेली. बाल मनावर प्रभाव टाकणारे पुस्तक.

पुस्तकाचे नाव.
गावाकडे चल माझ्या दोस्ता
लेखकाचे नाव. : इंद्रजीत भालेराव
प्रकाशक.निर्मल : कुमार सूर्यवंशी
पृष्ठसंख्या : ४० किंमत. : ३५

***

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ नागनाथ कोत्तापल्ले



ज्योतिर्मय साहित्य

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# रिडींग रुम पेक्षा ग्रंथालयांना प्राधान्य द्यावे

## ग्रंथोत्सव : ''ग्रंथालय व स्पर्धा परीक्षा'' परिसंवाद

ज्योतिर्मय साहित्य

**जालना** – ग्रंथालयांकडे पाठ फिरवल्यामुळे माणूसपण संपत चालले. रिडींग रूममध्ये जाणारे ठराविक विद्यार्थी लॅपटॉप, मोबाईल सोबत नेतात. पुस्तके केवळ दाखवण्यासाठीच असतात. मोबाईल मध्ये काय पाहतात हा एक संशोधनाचा विषय असून स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी केवळ माहितीच मिळवत आहेत. ज्ञानाने परिपूर्ण होत नाहीत. आज माहितीचा स्फोट झाला असला तरी मोबाईल ,लॅपटॉपमुळे एकाग्र शक्ती कमी झाली आहे. पुण्यात जाऊन स्टडी सेंटरवर अभ्यास केल्यास यश मिळते असे नाही. पारंपारिक ट्रेंडच्या मागे न धावता स्पर्धा परीक्षांचा बदललेला पॅटर्न समजून घ्यावा, रिडिंग रूम मध्ये केवळ आपलीच पुस्तके न्यावी लागतात या उलट ग्रंथालयात अनेक संदर्भ ग्रंथ उपलब्ध असल्याने स्पर्धा परीक्षेची तयारी करताना ग्रंथालयांनाच प्राधान्य द्यावे. असा सूर मान्यवरांनी आज परिसंवादात व्यक्त केला.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सुरू असलेल्या ग्रंथोत्सवात गुरुवारी ( ता. २७) डॉ. शशिकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली '' ग्रंथालय व स्पर्धा परीक्षा '' या विषयावर




परिसंवादात नायब तहसीलदार दिलीप सोनवणे , डॉ. निकेश मदारे, पांडुरंग सांगळे ,जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, शंकर पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. तहसीलदार दिलीप सोनवणे यांनी वर्ग ३ आणि ४ ची पदे भरताना एमपीएससीचाच पॅटर्न असून स्पर्धा परीक्षेचे बदललेले स्वरूप समजून घेत बदल आत्मसात करावे, युट्युब, टेलिग्राम चॅनेलवर असलेल्या माहितीच्या स्फोटात वाहवत जाऊ नये असे सांगून विद्यार्थी दशेपासून स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतांना ग्रंथालयांचा झालेला फायदा दिलीप सोनवणे यांनी विषद केला. डॉ. निकेश मदारे यांनी मोबाईल मुळे डोक्यातील ज्ञान संपत चालले असून महापुरुष ,तत्त्ववेत्ते ज्यांना कळाले तेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होतात. १५ सेकंदाच्या रील मुळे लक्ष विचलित होते. पुस्तके वाचताना एकाग्रता वाढते असे सांगून भविष्यात ग्रंथालयांना ऑक्सिजन हॉटेल, फार्म हाऊस प्रमाणे दिवस येतील असे डॉ निकेश मदारे यांनी नमूद केले. पांडुरंग सांगळे यांनी भगवदगीता, महाभारतातील पात्र, प्रवासवर्णने विशद करून पुस्तके जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात. आज साधने उपलब्ध असली तरी वाचन चळवळ नाही त्यासाठी जागृती करावी असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ.शशिकांत पाटील यांनी गरीब ,उपेक्षित ,दारिद्र्य अवस्थेतील अनेक विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षांनी उद्धार केला असून आज ज्ञानाची लालसा नसलेली , संवेदनाहीन ,गांभीर्य हरवलेली पिढी झापडे लावल्यासारखी परीक्षा देत आहे .मात्र काही विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य सुध्दा नाही. भोवताल,वास्तव, आणि वेदनेला आपलसं कराव लागेल.

स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना विद्यार्थी कमी पडत असून ग्रंथालयांनी गाव पातळीवर शाळेत एक दिवस ग्रंथांचे प्रदर्शन लावले पाहिजेत असे प्रा. शशिकांत पाटील यांनी नमूद केले. सुत्रसंचालन प्रा. कृष्णा कदम यांनी केले तर पंडितराव तडेगांवकर यांनी आभार मानले. यावेळी वाचन प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते डॉ. हेडगेवार यांच्यावरील जीवनचरित्राचे प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – फुटीरतावादी प्रवृत्ती आजही देशाच्या काही राज्यांमध्ये सक्रिय असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा एकतेचा संदेश आज पूर्वीपेक्षाही अधिक प्रासंगिक आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले. राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते शनिवारी डॉ. हेडगेवार यांच्यावरील जीवन चरित्राचे राजभवन, मुंबई येथे प्रकाशन पार पडले, त्यावेळी ते बोलत होते.

ब्रिटिश भारतीय युवा लेखक सचिन नंदा यांनी 'हेडगेवार : अ डेफिनिटिव्ह बायोग्राफी' या इंग्रजी चरित्रात्मक ग्रंथाचे लेखन केले आहे. आपसात एकी नसल्यामुळे अवघ्या काही हजार ब्रिटिशांनी भारतावर अनेक दशके राज्य केले असे सांगून फुटीरतेमुळे महाराणा प्रताप यांना देखील पराभव पाहावा लागला होता, मात्र छत्रपती शिवाजी महाराज अशा फुटीर प्रवृत्तींना पुरून उरले, असे राज्यपालांनी सांगितले.

परकीय शासकांमुळे भारत एकसंध राष्ट्र झाले असे चुकीचे दावे केले जातात असे सांगून सम्राट अशोक यांच्या काळात भारत कितीतरी दूरपर्यंत जोडला गेला होता, असे राज्यपालांनी सांगितले. सांस्कृतिक व अध्यात्मिकदृष्टया भारत नेहमीच एक राष्ट्र होते असे त्यांनी सांगितले.

यावेळी लेखक सचिन नंदा यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रकाशन सोहळ्याला एशियन पेंट्सचे प्रवर्तक जलज दाणी, आवादा ग्रुपचे अध्यक्ष विनीत मित्तल, मोहित डायमंड्सचे व्यवस्थापकीय संचालक मोहित मेहता, लेखक सचिन नंदा, एनएसईचे प्रमुख डॉ. आशिषकुमार चौहान, रवींद्र संघवी, मिलिंद घुमरे आणि इतर निमंत्रित उपस्थित होते. समीर कोपीकर यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांचे विचार असे हवेत

ज्योतिर्मय साहित्य

२६ जानेवारी जवळ आली होती. शाळेत विविध स्पर्धा सुरू झाल्या होत्या. चित्रकला,भाषण, काव्यवाचन, सोबतच मैदानी खेळांच्या स्पर्धा सुद्धा सुरू होत्या. आनंद नगरीचा आनंद मुलांनी घेतला होता. मुलांनी त्यांच्या हातांनी बनवलेल्या विविध पदार्थांचा आनंद शिक्षकांनी सुद्धा लुटला होता. कबड्डी, खो-खो, लंगडी, लांब उडी,उंच उडी धावण्याचे स्पर्धा झाली. कोणी सांघिक स्पर्धेत जिंकले तर कोणी वैयक्तिक स्पर्धेत बक्षीस मिळवले.

शाळेत मुलांची संख्या मर्यादित आहे. निवासी शाळा असून स्कॉलरशिप मधून येथे मुले निवडून प्रवेशित होतात. आता आणि गावात चांगल्या शाळा निघाल्या आहेत. शिक्षणाचे सोय गावातच चांगली होत असल्यामुळे निवासी शाळेत त्यातल्या त्यात शासकीय शाळेमध्ये पाठविण्याचा पालकांचा कल कमी झाला आहे. म्हणून आमच्या शाळेत इयत्ता सातवी ला २२ विद्यार्थीच प्रवेशित झाली. ह्या २२ पैकी २० मुले सध्या होस्टेलला उपस्थित होती. दोघे आजारी असल्यामुळे गावी गेलेले होते.

एकंदरीत प्रजासत्ताक दिना निमित्ताने होणाऱ्या विविध स्पर्धेत ह्या वर्गातील २० पैकी १८ जणांना कोणत्या ना कोणत्या स्पर्धेत म्हणजेच वैयक्तिक असो वा सांघिक स्पर्धेत बक्षीस मिळालेले होते. पण दोन विद्यार्थी असे होते की ज्यांना कोणतेच पारितोषिक भेटणार नव्हते. ह्या अठरा जणांनी आपल्या वर्ग मित्रांचा विचार केला. कोणत्यातरी स्पर्धेत या दोघांना पारितोषिक मिळाले पाहिजे असे काहीतरी करू, हे त्यांनी ठरविले.

संगीत खुर्ची स्पर्धा बाकी राहिली होती. सातवीच्या मुलांना ग्राउंड वर येण्यास सांगितले. खुर्च्या लावलेल्या होत्या. एका मुलाच्या डोळ्याला पट्टी बांधली होती त्याने ढोल वाजवायचे ठरविले. त्याची ढोल वाजवणे थांबले की मुलांनी खुर्ची पकडायची. प्रत्येक वेळी खुर्च्या असून सुद्धा काही बसत होती तर काही मुलं मात्र बसत नव्हती. असे करत करत ह्या विद्यार्थ्यांची स्पर्धा संपली. दोन मुले जे शेवटपर्यंत खुर्ची मिळवीत होती ते जिंकली. एकंदरीत ह्या वर्गाची संगीत खुर्चीत खुर्ची मिळवण्याची स्पर्धा दिसत नव्हती. कुणाला तरी जिंकवण्याच्यासाठी मुलं आपल्याला खुर्चीवर बसण्याची संधी मिळून सुद्धा बसत नव्हती.

शेवटी न राहवल्यामुळे मी मुलांना विचारले. तेव्हा ते सांगायला लागले, '' आम्ही वीस पैकी १८ जणांना वैयक्तिक अथवा सांघिक स्पर्धेत पहिले अथवा दुसरे बक्षीस मिळाले आहे. पण आमच्यातील फक्त दोघेच राहिले की ज्यांना एक सुद्धा बक्षीस मिळालेले नव्हते. त्यांना किमान ह्या स्पर्धेत तरी पहिला व दुसरा वैयक्तिक बक्षीस मिळावे ह्या हेतूने आम्ही मागे मागे राहिलो. आता आमच्या वर्गातील प्रत्येकाकडे किमान एक तरी प्रमाणपत्र असेल. ''

**मुलांच्या या विचाराला काय म्हणावे ?**

आजच्या युगात कट कारस्थान करून स्वतःच्याच पदरात कसे काही पाडून घेता येईल याच्याच प्रयत्नात लोक असतात.. इतका सरळ आणि निर्मळ विचार मुलांनी केला. क्षणभर मी भारावून गेलो. काय म्हणावं यांना? हेच कळले नाही. सक्का भाऊ जिथे छोट्याशा जमिनीच्या तुकड्यासाठी भावावरच कुराड उगारतो काही संबंध नसताना आपल्या वर्ग मित्राला कोणतेच बक्षीस मिळाले नाही, त्याला सुद्धा बक्षीस मिळण्याचा आनंद भेटावा यासाठी सर्वांनी मिळून ही कृती करणे,.. ही साधारण बाब नाही. अनेकदा आपण पाहतो काही मुले अनेक स्पर्धेत भाग घेतात. बक्षीस सुद्धा मिळवतात. धावण्याच्या स्पर्धेत तोच पहिला, भाषण स्पर्धेत तोच पहिला, खोखोत त्याचा संघ विजयी. अशा मुलांचे ऑलराऊंडर म्हणून आपण कौतुक करतोच. पण आपला मित्र जिंकावा म्हणून स्वतः हरणारे कुठे पाहिले आहेत का? पण अशा गोष्टी शासकीय विद्यानिकेतन मध्येच पाहायला मिळतात. एका गावाचे नाही, एका जातीचे नाही, एका धर्माचे नाही, पण मित्र आहोत ना. बस, इतकेच पुरे. मित्रासाठी काहीही करतील. म्हणूनच म्हणतात ना भाऊ नसला तरीही चालेल पण मित्र मात्र असावा.

***



विद्यार्थ्यांशी हितगुज
नीलकंठ लोसरवार.
शासकीय विद्यानिकेतन
छत्रपती संभाजीनगर




# माझे बालपण

ज्योतिर्मय साहित्य

मित्र हो नमस्कार

''म्हातारपण '' आले की ''बालपण'' आठवायला लागते.

बालपणीचे दिवस आठवण्यात हरवून जाणे हाच मोठा विरंगुळा असतो.

आजोबा म्हणून नातीला किंवा नातवाला गोष्टी सांगताना

आबा स्वतःचे बालपण सांगतात आणि नवी पिढी उत्स्फूर्तपणे ऐकून घेते हे मोठे सुखद असते मित्रांनो.

लहानपण की बालपण यातले नेमके काय निवडावे ?

असा प्रश्न पडला मग त्याचे उत्तर असे मिळाले की

माणूस कितीही मोठा झाला तरी त्याच्यात एक लहान मूल दडलेले असते, म्हणजे लहानपण ''सोबत करते.

''बालपण मात्र गेले की गेलेच, पुन्हा ती बालपणीची निरागसगता '' आपल्याला कायमची सोडून जाते.

एक मात्र नक्की मित्रानो–

बालपण आणि बालपणीचे दिवस यांच्या आठवणी मनाला गहिवरून टाकतात, व्याकुळ करून टाकतात.

माझ्या बालपणीच्या आठवणी या पन्नासच्या दशकातील

आहेत..मौंज होईपर्यंत आपण बालक असतो, कुमार होतो.

या हिशेबाने माझे बालपण हे १९५१ –माझ्या जन्म साला

पासून सुरू होते ते पुढे अकरा वर्षांचा म्हणजे वर्ष १९६२

माझी मौंज होई पर्यंतचे माझ्या बालपणीचे दिवस आहेत.

मराठवाड्यातील मानवत जि. परभणी, येथे १९५१ ते १९६०, असतांना गावठी शाळा आणि पहिली ते तिसरी मी शिकलो. पुढे वैजापूर जि. औरंगाबाद येथे १९६०–१९६३ येथे असतांना चौथी ते आठवी हे वर्ग सरकारी शाळेत शिकलो.

वैजापूरच्या वास्तव्यात बालपण सरले आणि लहानपण सुरू झाले. आधुनिक सुखसोयीची ''कल्पना तेव्हा अस्तित्वात नव्हती. या छोट्याशा शहरातले जीवनमान साधारणतः मध्यम परिस्थितीचे होते. रेल्वे हेच प्रवासाचे परवडणारे साधन होते, बस ने प्रवास ''करणारी कमी जनता होती.

शाळेत वर्गातील मुले मित्र असायची आमच्या मनात ''गरीब–श्रीमंत ''असा भेदभाव विचार कधीच नसे.एका बेंचवर बसून बसून घट्ट मैत्री करणारे मित्र–मन प्रत्येकाच्या जवळ होते.

मुलांना पॉकेटमनी देणे ''हे पालक कधीच करत नसत.

बाहेरचे खाणे, हॉटेलात जाणे '' यापासून मुलं दूर असायची

माझ्या बालपणीच्या दिवसातील बहुसंख्य ''मुलांचे वडील

हे संतापी–रागीट, आणि कडक स्वभावाचे ''होते, अनेक वेळा अनेक घरात हे पाहिलेले मला आज ही जसेच्या तसे आठवते.

याचे कारण मात्र मला आता शोधता आले आहे, माझ्या मते तेव्हाची ही पुरुष माणसे त्यांच्या '' नोकरितले टेन्शन, त्यांचे अपयश '', मनाची उध्वस्त झालेली स्वप्ने ''

आर्थिक ताण, ओढाग्रस्त–सांसारिक जीवन '' याचा राग आणि यांचे खापर ते ऑफिसातून घरी आल्यावर आपल्या घरातील माणसांवर फोडायचे ''.

घरातील लहान मुले आणि स्त्रिया '' कर्त्या–पुरुषाचा हा उद्रेक शांतपणे सहन करीत''

बालपणीच्या या आठवणीचे विश्लेषण आता म्हातारपणी करणे जमलंय असे वाटते.

१९६० च्या अगोदर मराठवाडा हा निजामशाहीचा भाग होता, म्हणून मोगलाई– आणि निजामशाही ''असे वातावरण

माझ्या लहानपणी होते.

साधारण जीवनमानात संतुष्ट रहाणे, आहे त्यात सुख मानत. आनंदात रहायचे, बालपणीच्या दिवसांनी ही शिकवण दिलीय.

या बालपणी मित्रांच्या सोबत वाड्यात, चाळीत रहात असतांना जितके खेळून झाले, तसे पुन्हा कधीच खेळता आले नाही.

विटी–दांडू, चोर–शिपाई, लगोरी, सूर–पारंब्या, शाळेत

खो–खो, हुतूतू, सुट्टीच्या दिवसात – लाल पान सात, नॉट ऐट होम, पाच–तीन–दोन, गाण्याच्या भेंड्या ''

या खेळांचा आनंद घेतला.

मित्र हो, आठवलं तसं सांगितलंय, गोड मानून घ्यावे.

***

अरुण वि.देशपांडे
पुणे
९८५०१७७३४२

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559